नियमित फौजदारी खटला नं.४१५/२०२४
निशाणी- ३९

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.३ चा जबाब.

मी शपथेवर कथन करते की,
माझे नांवः- आकांक्षा प्रकाश बनकर
वयः- ११वर्षे, धंदाः- इयत्ता ५वी ला शिकते
राहणार- सावेडी, अहमदनगर

साक्षीदार ही सज्ञान नसल्यामुळे व तिला शपथेचे महत्व आहे काय याकरिता खालीलप्रमाणे प्रश्न विचारत आहे.

| | |
|---|---|
| प्रश्न | आज तु कुठे आली आहे ? |
| उत्तर | मी आज कोर्टात आले आहे. |

| | |
|---|---|
| प्रश्न | कोर्टात कसे बोलायचे असते? |
| उत्तर | खरे बोलायचे असते. |

| | |
|---|---|
| प्रश्न | खरे बोलले नाही तर काय होईल ? |
| उत्तर | सजा होईल. |

वरिल प्रश्न उत्तरावरुन साक्षीदाराला शपथेचे महत्व कळत आहे असे दिसुन येते. करिता सदर साक्षीदाराचा सरतपास शपथेवर अभियोग पक्षातर्फे सहा. सरकारी वकील श्रीमती सिमा शेख यांचेकडूनः-

१. दि. १७/१२/२०२३ रोजी ४.३० वा. मी घराच्या पाठीमागे खेळत होते. उदय ओव्हळ काका यांनी मला डाव्या पायाच्या गुडघ्यावर लोखंडी गज मारला. त्यामुळे मी माझ्या मम्मीकडे गेले. तिला मारहाणीबाबत सांगितले. मी आरोपीला ओळखते ते आज न्यायालयात हजर आहे. त्यानंतर मी व मम्मी पोलीस स्टेशनला गेलो. तेथुन आम्ही दवाखान्यात गेलो.

सरतपास पूर्ण.

उलटतपास आरोपींतर्फे विधिज्ञ श्री. श्रीकांत गवळी यांचेमार्फतः-

२. मी सखाराम विद्ये प्राथमिक विद्यालय या शाळेत जाते. माझी शाळा ११.०० ते ०५.०० वा. पर्यत असते. माझ्या कॉलनीत माझ्या वयाचे दोन तीन मुले आहेत. हे म्हणणे खरे आहे की, शाळा सुटल्यावर किंवा सुट्टीच्या वेळेस आम्ही सर्व मिळुन खेळतो. हे म्हणणे खरे आहे की, खेळताना जोरात आरडा ओरडा केला तर तेथील काका शांत खेळा असे म्हणतात.

हे म्हणणे खरे आहे की, खेळताना एखादाजण पडतो व त्याला लागते. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या कॉलनीतील घराच्या पाठीमागे मोकळया जागेत आम्ही खेळतो. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या घराच्या मागे बांधकामाचे साहित्य पडलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही तेथे राहत होतो तेथे माझी आजी राहत होती. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या घराच्या बाजुला मिरा आजी बनकर ही राहत होती. माझे आजोबा कुठे राहतात हे मला माहित आहे परंतु पत्ता मला माहित नाही. ते बरेच दिवसापासुन तिकडे राहायला गेले.

३. हे म्हणणे खरे नाही की, मी घराच्या पाठीमागे खेळत असताना मी पडले होते व माझ्या डाव्या नडगीला थोडे खरचटले होते. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने मला डाव्या नडगीवर कधीच मारले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी व मिरा आजी हे एकमेकांच्या घरी जाणे येणे करतात. हे म्हणणे खरे नाही की, मिराआजी राहत असलेल्या खोलीत माझे आजोबा राहत होते त्याला काढुन टाकल्यामुळे माझ्या आईने सदर खोटी फिर्याद दिली. हे म्हणणे खरे नाही की, आज सकाळी माझ्या आईने न्यायालयात डाव्या गुडघ्यावर मारल्याचे सांग असे मला सांगितले होते.

उलट तपास पुर्ण.

फेर तपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,
समक्ष,

LAXMIKANT SUDAMRAO PADHEN
Digitally signed by LAXMIKANT SUDAMRAO PADHEN
DN: cn=LAXMIKANT SUDAMRAO PADHEN, ou=BOMBAY HIGH COURT,CID - 6946981, o=BOMBAY HIGH COURT, st=Maharashtra, c=IN
Date: 2026.02.16 18:05:28 +0530

( एल. एस. पाढेण )
मुख्य न्यायदंडाधिकारी
अहमदनगर.

दि.१६/०२/२०२६.
अहमदनगर